ठाणे वैभव
14-10-06

# कलिका विचारे, पाटील, महाजन हिंदळेकर, मळेकर, पराडकरांना बक्षिसे

ठाणे, दि.१३ (वार्ताहर) - ठाणे महानगरपालिका आणि ठाणे फोटो सर्कल सोसायटी यांच्या विद्यमाने घेण्यात आलेल्या छायाचित्र स्पर्धेत कलिका विचारे, रुपाली पाटील, अजय महाजन, किरण हिंदळेकर, अतुल मळेकर, आणि परेश पराडकर यांना विविध विषयांमध्ये प्रथम पारितोषिक मिळाले.

छायाचित्र स्पर्धा आणि प्रदर्शनाचे उद्घाटन शिवसेना नेते मनोहर जोशी यांच्या हस्ते आज झाले. सुप्रसिद्ध छायाचित्रकार काकुभाई कोठारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महापौर राजन विचारे अध्यक्षस्थानी होते. उपमहापौर गणेश साळवी, उपजिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, नरेश म्हस्के आदी उपस्थित होते.

छायाचित्रे बघताना वेगळ्या विश्वात गेल्याचा आनंद मिळाला, अशी भावना श्री जोशी यांनी व्यक्त केली. छायाचित्रांचा दर्जा दरवर्षी वाढत असल्याचे महापौर विचारे म्हणाले. संध्याकाळ, बाजारहाट,

(पान ४ वर)



**बिंब-प्रतिबिंब.....**

ठामपा आणि ठाणे फोटो सर्कल सोसायटीच्या स्पर्धेत किरण हिंदळेकर यांच्या या निसर्गछायाचित्रास प्रतिबिंब या विषयात प्रथम पारितोषिक मिळाले.

ठाणे वैभव
14-10-06